पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- २०१८-२०१९

## समाजशास्त्र विभाग

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

## समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पुढील कार्यक्रम घेतले आहेत.

**कै. धुपाजी खोतकर पुरस्कार:-**

महाविद्यलयात दि. ०४ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत सत्कार कार्यक्रमात समाजशास्त्र बी. ए. तृतीय वर्षातील मुख्य विषय घेतलेल्या विद्यार्थ्यातून (शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ साठी) प्रथम आलेल्या कु. प्रियंका शेषराव गायकवाड या विद्यार्थीनीस कै. धुपाजी खोतकर पुरस्कार मा. अन्सार शेख (आय.ए.एस.) आणि मा. श्री. ना. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**अतिथी व्याख्यान:-**

- दि. १३ ऑगस्ट २०१८ रोजी श्री. मनोज अंबादास गाडेकर (विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयक, एम.जी.एम., हॉस्पिटल, औरंगाबाद) यांनी ''समाजशास्त्र आणि समाजकार्य यातील सहसंबंध'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- दि. १० जानेवारी २०१९ रोजी डॉ. अफरोज बेगम (समाजशास्त्र विभाग, मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद) यांनी ''संशोधनातील एस.पी.एस.एस. चा उपयोग'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन :-**

- दि. १७ सप्टेंबर २०१८ रोजी ''बालगुन्हेगारी'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा.दिनेश कचकुरे व महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले.
- दि. २६ जानेवारी २०१९ रोजी ''शाश्वतविकास'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा. श्री. प्रविणदादा घुगे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोग) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले.

**सेमिनार:-**

- दि. ११ सप्टेंबर २०१८ रोजी बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ''सामाजिक समस्या'' या विषयावर सेमिनार घेण्यात आले. यामध्ये १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- दि. ०४ फेब्रुवारी २०१९ रोजी बी. ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे "भारतीय लोकसंख्या वाढ" या विषयावर सेमिनार घेण्यात आले. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**गटचर्चा:-**

- दि. १० सप्टेंबर २०१८ रोजी बी. ए. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची "महिला विरोधी हिंसा" या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी बी. ए. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची "पुलवामा येथील दहशतवादी हल्ला" या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**महापरिनिर्वाण दिन व्याख्यान :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ०६ डिसेंबर २०१८ रोजी डॉ. व्यंकटेश लांब (इतिहास विभाग प्रमुख, इंद्रराज कला महाविद्यालय, सिल्लोड) यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. व्यकंटेश लांब यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेवर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, बाबासाहेबांनी वर्तमानपत्रांच्यामाध्यमातून लोकांना जाती प्रथा, रुढी परंपरा, अंधश्रद्धा व राजकारण या विषयी जागृत केले. त्यांनी बाबासाहेबांचा मुकनायक, बहिष्कृत भारत ते प्रबुद्धभारत असा पत्रकारितेचा प्रवास उलगडला. सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. विजय पांडे यांनी भुषविले होते.

**अभ्यास सहल :-**

समाजशास्त्र विभागाची शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ ची अभ्यास सहल दिनांक ०६ फेब्रुवारी २०१९ रोजी "बाबासाई एड्सग्रस्त मुला-मुलींचे बालकाश्रम" औरंगाबाद येथे नेण्यात आली होती. सदरील सहलीत ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामाजिक सर्वेक्षण :-**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विभागाच्या व संशोधन समितीच्या संयुक्त विद्यमाने वतीने "फुलंब्री तालुक्यातील विहीर अनुदान योजना लाभार्थी सर्वेक्षण" करण्यात आले. तालुक्यातील २५ गावांमधून ६४ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. सदरील सर्वेक्षणातील तथ्य संकलन प्रा. अनिल जाधव व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले.

**पी.पी.टी. तासिका :-**

समाजशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ०८ पी.पी.टी. तासिका घेतल्या आहेत.

| दिनांक | विषय | विद्यार्थी संख्या | वर्ग |
|---|---|---|---|
| १६/०७/२०१८ | स्थलांतराचे प्रकार | १० | बी.ए. द्वितीय वर्ष |
| ०७/०८/२०१८ | संस्कृतीचे वैशिष्ट्ये | १८ | बी. ए. प्रथम वर्ष |
| १३/०९/२०१८ | संशोधनाच्या पायऱ्या | ०८ | बी. ए. तृतीय वर्ष |
| १५/०९/२०१८ | कौटुंबिक हिंसाचार | ०९ | बी.ए. द्वितीय वर्ष |
| २१/११/२०१८ | वृद्धांच्या समस्या | १३ | बी.ए. द्वितीय वर्ष |
| १०/०१/२०१९ | ग्रामीण समाजशास्त्र ओळख | २२ | बी. ए. प्रथम वर्ष |
| १५/०२/२०१९ | शासकीय योजनेतील भ्रष्टचार | १० | बी.ए. द्वितीय वर्ष |
| १५/०२/२०१९ | टॉलकॉट पारसन्स सिद्धांत | ०८ | बी. ए. प्रथम वर्ष |

# समाजशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष : २०१८१९

## कार्याक्रमाची छायाचित्रे

### कै. धुपाजी खोतकर पुरस्कार




समाजशास्त्र विषयात प्रथम आलेल्या कु. प्रियंका शेषराव गायकवाड या विद्यार्थीनीस कै. धुपाजी खोतकर पुरस्कार मा. अन्सार शेख (आय.ए.एस.) आणि मा. श्री. ना. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते प्रदान करतांना

### अतिथी व्याख्यान



दि. १३ ऑगस्ट २०१८ रोजी श्री. मनोज अंबादास गाडेकर (विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयक, एम. जी. एम., हॉस्पिटल, औरंगाबाद) हे "समाजशास्त्र आणि समाजकार्ययातील सहसंबंध" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना



दि. १० जानेवारी २०१९ रोजी डॉ. अफरोज बेगम (समाजशास्त्र विभाग, मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद) ह्यां "संशोधनातील एस.पी.एस.एस. चा उपयोग" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

## भित्तीपत्रक प्रकाशन



दि. १७ सप्टेंबर २०१८ रोजी ''बाल गुन्हेगारी'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करतांना प्रा. दिनेश कचकुरे व महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले




दि. २६ जानेवारी २०१९ रोजी ''शाश्वतविकास'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करतांना मा. श्री. प्रविणदादा घुगे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोग) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर.टकले

## गटचर्चा



दि. १० सप्टेंबर २०१८ रोजी ''महिला विरोधी हिंसा'' या विषयावर गटचर्चा करतांना विद्यार्थी



दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी ''पुलवामा येथील दहशतवादी हल्ला'' या विषयावर गटचर्चा करतांना विद्यार्थी

## सेमिनार



दि. ११ सप्टेंबर २०१८ रोजी ''सामाजिक समस्या'' या विषयावर सेमिनार करतांना मोनाली उबाळे ही विद्यार्थीनी



दि. ०४ फेब्रुवारी २०१९ रोजी ''भारतीय लोकसंख्या वाढ'' या विषयावर सेमिनार करतांना सीमा जाधव ही विद्यार्थीनी

## अभ्यास सहल

समाजशास्त्र विषयाची अभ्यास सहल दिनांक ०६ फेब्रुवारी २०१९ रोजी ''बाबा साई एड्सग्रस्त मुला-मुलींचे बालकाश्रम'' औरंगाबाद येथे नेण्यात आली होती. सहभागी विद्यार्थी - 40



एड्सग्रस्त मुला-मुलींचे बालकाश्रमा बद्दल माहिती सागतांना संचालक श्री. मनोज वाकोडे



एड्सग्रस्त मुलां-मुली सोबत विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग





एड्सग्रस्त मुलां-मुली सोबत समाजशास्त्र विषायाचे विद्यार्थी

## सामाजिक सर्वेक्षण



"फुलंब्री तालुक्यातील विहीर अनुदान योजना लाभार्थी" सर्वेक्षण करतांना प्रा. अनिल जाधव व प्रा. बाबासाहेब लहाने

# समाजशास्त्र विभाग - राज्यस्तरीय परिसंवाद

## "सामाजिकशास्त्र संशोधनातील उदयोन्मुख समस्या"

## दि. १३ फेब्रुवारी २०१९

## कार्यक्रमाची छायाचित्रे

## उद्घाटन समारंभ



पाहुण्यांचे औक्षण करतांना समाजशास्त्र विषयाची विद्यार्थीनी




परिसंवादाचे उद्घाटन करतांना डॉ. संजय साळुंके




डॉ. संजय साळुंके यांचे स्वागत करतांना डॉ. एस. आर. टकले




परिसंवादाचे बीजभाषक डॉ. अनिल कुमार वावरे यांचे स्वागत करतांना डॉ. पी. एम. कल्याणकर




परिसंवादाचे बीजभाषण करतांना डॉ. अनिल कुमार वावरे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा)




परिसंवादाचे उद्घाटनपर भाषण करतांना (अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)